महाराष्ट्र शासन
# कला संचालनालय
सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
E-mail- controllerofexamination.doa@gmail.com

क्रमांक — डिओओ/२०१९/IV/ ९४३ दिनांक :- ०१.०७.२०१९

## परिपत्रक

मुख्याध्यापक / प्राचार्य तथा केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे संचालनालयामार्फत शासकीय रेखाकला परीक्षा २०१९ चे आयोजन माहे सप्टेंबर मध्ये करण्यात आलेले आहे. परीक्षानिहाय वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **एलिमेंटरी ग्रेड परीक्षा : गुरुवार दि.२६ सप्टेंबर २०१९** | **सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वस्तुचित्र<br>दुपारी २.०० ते ४.०० स्मरणचित्र** |
| **शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०१९** | **सकाळी १०.३० ते दुपारी १.०० संकल्पचित्र नक्षिकाम<br>दुपारी २.०० ते ४.०० कर्तव्य भूमिती व अक्षरलेखन** |
| **इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा : शनिवार दि.२८ सप्टेंबर २०१९** | **सकाळी १०.३० ते दुपारी १.३० स्थिरचित्र<br>दुपारी २.३० ते ४.३० स्मरण चित्र** |
| **रविवार दि.२९ सप्टेंबर २०१९** | **सकाळी १०.३० ते दुपारी १.३० संकल्पचित्र नक्षिकाम<br>दुपारी २.३० ते ५.३० कर्तव्य घनभूमिती व अक्षरलेखन** |

२. परीक्षा आवेदनपत्रक सहभागी शाळांकडून/ विद्यार्थ्यांकडूनभरुन घेण्यासाठी तसेच संबंधित भरलेली आवेदनपत्रके व परीक्षा फी या कार्यालयात पाठविण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

**अ)** सहभागी शाळांनी/ विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्राकडे अर्ज करण्याची अंतिम तारीख : **दि. २७ जुलै, २०१९.**

**ब)** केंद्रांनी परीक्षा नियंत्रक , कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे निकालपत्रके दोन प्रतित सीडीसह, व परीक्षा फी सादर करण्याची अंतिम तारीख : **शुक्रवार दि. ०७ ऑगस्ट, २०१९.** एलिमेंटरी व इंटरमिजिएट शासकीय रेखाकला परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| | परीक्षा | महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी | महाराष्ट्र राज्याबाहेरील राज्यातील विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|---|---|
| १) | एलिमेंटरी | रुपये ५०/- | रुपये १००/- |
| २) | इंटरमिजिएट | रुपये १००/- | रुपये २००/- |

**क)** दरवर्षीप्रमाणे आकस्मिक खर्चापोटी देय असलेली रक्कम रु.२०/- प्रती विद्यार्थी कपात करुन उर्वरित शुल्क **कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (Director, Directorate of Art. M.S., Mumbai)** यांच्या नांवे धनाकर्षाव्दारे (D.D.) आकस्मिक खर्चाच्या रोख रक्कमेच्या पावतीसह या कार्यालयात पाठविण्यात यावे. व खर्चाची स्वतंत्र नोंद ठेवण्यात यावी. केंद्र प्रमुखांनी परीक्षा प्रवेश संबंधीची कार्यवाही त्वरीत सुरु करुन तसेच प्रवेशाची अंतिम तारीख कळविणारे परिपत्रक आवश्यक त्या आवेदनपत्रासह सहभागी शाळांना पाठविण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे परीक्षेस प्रविष्ठ होणारे इच्छुक विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहूनये म्हणून सदर परिपत्रक सर्वसंबंधितांच्या निदर्शनास आणावे व एक प्रत नोटीस बोर्डवरही प्रसिध्द करण्यात यावी.

**३.ओळखपत्राबाबत महत्वाची सूचना :-** शासकीय रेखाकला परीक्षांकरीता प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना ओळखपत्र विहित नमुन्यात फोटोसहित त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या सही शिक्का असलेले दोन प्रतीत तयार करावे . त्याची एक प्रत केंद्रप्रमुखांनी स्वत:कडे ठेवावी व दुसरी प्रत केंद्र प्रमुखांनी त्यावर सही करुन विद्यार्थ्यांस परत करावी, की जी संबंधित विद्यार्थ्यांने प्रत्यक्ष परीक्षेच्या कालावधीत स्वत:जवळ ठेवावयाची आहे.

**४. आवेदनपत्रक संगणकीकृत तयार करताना घ्यावयाची दक्षता :-** एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षांच्या विदयार्थ्यांच्या नावांची यादी सोबतच्या नमुना फॉर्म नुसार लिगल साईज मध्ये तयार करण्यात यावी. तसेच नावांची यादी मायक्रोसॉफ्ट एक्सेल, TIMES NEW ROMAN १२ Pt. इंग्रजी कॅपिटल अक्षरामध्ये तयार करण्यात यावी. तसेच एका पानावर फक्त **२०** विद्यार्थ्यांचीच नावे टंकलिखीत करावीत.

**५. आवेदनपत्रकात समाविष्ट विदयार्थ्यांची नांवे व माहिती सी.डी. स्वरुपात पाठविण्याबाबत :-** एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेच्या विदयार्थ्यांची तयार करण्यात आलेली यादी, मायक्रोसॉफ्ट एक्सेल फाईल केंद्र क्रमांक , परीक्षा वर्ष व परीक्षेचे नांवे सेव्ह करुन ,या कार्यालयात पाठविण्यात यावी. सी.डी. वर केंद्र क्रमांक, परीक्षा वर्ष, व परीक्षेचे नांव यांचा उल्लेख करण्यात यावा.

**६.** आपला केंद्र क्रमांक आपल्या आवेदनपत्रावर, उत्तरपत्रिकांच्या गठ्ठयावर तसेच परीक्षा संबंधी कागद पत्रांवर व दैनंदिन टपाल यावर ठळक लाल शाईने उल्लेख करावा.

**७.** आवेदनपत्रके व परीक्षा फीचा धनाकर्ष या कार्यालयास दिनांक ०७.०८.२०१९ पर्यंत टपालाद्वारे / हस्तपोच प्राप्त न झाल्यास व अशा केंद्रांचे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होऊ न शकल्यास तसेच याप्रकरणी कोणताही पेचप्रसंग उद्धवल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत केंद्राची / शाळेची राहील तसेच उशिरा प्राप्त होणा-या अर्जांची कोणतीही दखल या कार्यालयाकडून घेण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी. परीक्षेसंबंधी आवश्यक असणारे नमुने (प्रवेश पत्र, आकस्मीक खर्च पावती व इतर) www.doa.org.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्यात यावे.

(नागेश म. वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति, मुख्याध्यापक / प्राचार्य तथा केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा.

प्रत, १) संचालक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२) सर्व शिक्षण उपसंचालक, शिक्षण निरीक्षक, उत्तर / दक्षिण / पश्चिम, मुंबई व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषदे.
३) निवड नस्ती.